# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – १७ जुलै २०१५

## वर्धापन दिन व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ज्येष्ठ पत्रकार आणि इतिहासतज्ज्ञ डॉ.अरुण टिकेकर यांनी गुंफले

मुंबई- मुंबई विद्यापीठाच्या १५९ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विद्यापीठाने प्रथमच वर्धापन दिन व्याख्यानमालिकेचे आयोजन केले होते.या व्याख्यान मालिकेचे पहिले पुष्प ज्येष्ठ पत्रकार आणि इतिहासतज्ज्ञ डॉ.अरुण टिकेकर यांनी वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला गुंफले.मुंबई विद्यापीठाच्या सुरुवातीच्या इतिहासातील काही सार्वजनिक वाद हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.या व्याख्यानमालिकेत त्यांनी मुंबई विद्यापीठाच्या सुरुवातीच्या १०० वर्षाच्या इतिहासातील काही सार्वजनिक वादांवर प्रकाश टाकला.ज्यामध्ये त्यांनी १) इज ओरिएंटल इंटलेक्ट वर्न ऑउट २) व्हर्न्याकुलर लँग्वेज वर्सेस इंग्लीश ३) अ केस फॉर लॅटीन इन बॉम्बे ४) स्कॉलरशीप नॉट फॉर गर्ल स्टूडेंट ५) व्हाय ग्रॅज्युएट डाय यंग आणि ६) डॉक्टर जॉन मथाई एन्ड पंडित नेहरु या सार्वजनिक वादावर प्रकाश टाकला.ते म्हणाले की,मुंबई विद्यापीठाची एक समृध्दशाली परंपरा आहे.विद्यापीठाचे वर्तमान समजुन घेण्यासाठी या विद्यापीठाचा भूतकाळही समजुन घेणे तितकेच महत्वाचे आहे.मुंबई विद्यापीठाच्या सिनेट हॉल मध्ये घडलेल्या सार्वजनिक वादाच्या घटना,सुप्रसिध्द व्यक्तींचे दीक्षान्तपर भाषण हे नक्कीच समाजाच्या उपयुक्तेसाठी प्रेरणादायी ठरलेत.तसेच उच्च शिक्षणामध्ये कालपरत्वे झालेले बदल आणि स्थित्यंतर याचेही प्रतिबींब हे या सार्वजनिक वादातून अधोरेखित करण्यात आले आहेत.

मुंबई विद्यापीठाचे मा.कुलगुरु डॉ. संजय देशमुख यांच्या दुरदृष्टिकोनातून वर्धापन दिन व्याख्यानमालिकेची आज १५९ व्या वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला सुरुवात झाली.या प्रसंगी ते म्हणाले की,मुंबई विद्यापीठामध्ये प्रथमच ही वर्धापन दिन व्याख्यान मालिका सुरु करण्यात आली आहे, हा एक अभिनव उपक्रम असून वर्धापन दिन व्याख्यान मालिकेच्या अनुषंगाने समाजातील सुप्रसिध्द व्यक्तींचा ,त्यांच्या ज्ञानाचा फायदा जास्तीत जास्त लोकांना व्हावा तसेच अधिकाअधिक लोकांना अशा व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे या अनुषंगाने ही व्याख्यानमालिका आयोजित करण्यात आली असल्याचे मा.कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी सांगितले.समाजाचे विविध प्रश्न विद्यापीठाच्या माध्यमातून सोडविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असुन विद्यापीठाच्या माध्यमातून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचण्याचा विद्यापीठाचा मानस असल्याचे त्यांनी उपस्थिताना सांगितले. गुणवंत शिक्षकेत्तर सहका-यांचा सत्कार म्हणजे त्यांच्या विशेष योगदानाची प्रशासनातर्फे घेतलेली दखल असून त्याना यामुळे प्रोत्साहन मिळत असल्याचेही त्यानी सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या वर्धापन दिन समारंभाचे औचित्य साधून विद्यापीठातील गुणवंत शिक्षकेत्तर सहका-यांचा आणि मुंबई विद्यापीठातून पदवी प्राप्त करुन केंद्रीय लोक सेवा आयोग नागरी सेवा २०१४ परीक्षेत यश मिळविलेल्या मान्यवरांचा मा.कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.यामध्ये उपकुलसचिव रविंद्र साळवे,उपकुलसचिव (वित्त व लेखा) विजय तायडे,सहाय्यक कुलसचिव मोईनुद्दीन शेख यांच्यासह इतर गुणवंत सहका-यांना गौरन्वित करण्यात आले.सर जहांगीर कावसजी दीक्षान्त सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ.मृदूल निळे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.विभा सुराणा यांनी केले.या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.एम.ए.खान,वित्त व लेखा अधिकारी अशोक फळणीकर आणि विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणातील सदस्य,प्राचार्य,विभागप्रमुख,प्राध्यापक आणि विद्यापीठातील सहकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)